# नवा पायंडा

आज पाटलांच्या वाड्यात सकाळपासून धावपळ चालली होती. पाहुण्यांची गर्दी झाली होती. मंडपासमोर वाजंत्री वाजत होती. स्त्रियांची वस्त्रालंकार घालण्याची लगबग चालली होती. पुरुष हे आण, ते आण असं करू  न धांदल करत होते. पाटलांच्या वाड्यात आज त्यांची लाडकी भाची कुसुम हिचे लग्न होते. कुसुमचे आईवडील लहानपणीचप्लेगच्या साथीत वारले होते. मामांनीच या चारही भावांचा सांभाळ केला होता. मोठा भाऊही क्षयाने मृत झाला होता. त्याच्या खालच्या अमृत आणि सुवर्णा यांचाही विवाह मामांनी लावून दिला होता. अमृतला स्वत:ची मुलगी- कुमुद -देऊन घरजावई करू न घेतले होते आणि आज कुसुमचे लग्न झाले की त्यांची जबाबदारी संपणार होती.

बाबासाहेब पाटील वडगावचे मालगुजार होते. त्यांची इस्टेट खूप मोठी होती. दहा गावची मालगुजारी त्यांच्याकडे होती. शेती अवाढव्य पसरली होती. पिढ्यान् पिढ्याची संपत्ती त्यांच्या घरात चालत  आलेली होती. त्यांच्या आश्रयाने अनेक कुटुंबे जगत होती, अन्नाला लागली होती. अनेक निराधार स्त्रिया व मुले यांना बाबासाहेबांचाच आधार होता. बाबासाहेब हे व्यक्ती नसून जणू संस्थानच होते. सर्व निराधारांचा आधारवड होते. बाबासाहेबांचे व्यक्तिमत्व मोठे प्रभावी होते. तेज:पुंज कांती, गोल चेहरा, भरघोस मिशा यामुळे त्यांच्या रुबाबात भरच पडे. खणखणीत आवाज आणि भारदस्त व्यक्तित्वाला कर्तृत्वाची झाक असल्यामुळे त्यांच्याविषयी दरारा वाटे. "कोण आहे रे तिकडे" अशी खणखणीत आवाजात हाक आली की सर्वत्र चिडीचूप होई. त्यांचा पोषाखही त्यांच्या व्यक्तिमत्त्वात भर घाली. पुणेरी पगडी, कानात ठसठशीत मोत्यांची भीकबाळी, बोटात सोन्याच्या अंगठ्या, अंगात लांब कोट आणि करवतीकाठी पांढरेशुभ्र धोतर व उपरणे हा त्यांचा  नेहमीचा पोषाख असे. लोकल बोर्डात किंवा कलेक्टर कचेरीत जाताना ते नेहमी फुलसूटमध्ये जात. शिक्षण कमी असले तरी इंग्रजीवर त्यांचे प्रभुत्व होते. त्यामुळे त्यांच्याविषयी सर्वत्र आदराची भआवना असे. अशा बाबासाहेबांच्या भाचीच्या लग्नाची आज धांदल होती. त्यांना तिचे कन्यादान करावयाचे होते. वराचे स्वागत करण्यासाठी ते तयार झाले होते.

"आला आला, नवरदेव आला,"सर्वजण मंडपाकडे धावले. बाबासाहेबांच्या पत्नी लक्ष्मीबाईंनी मांडवासमोर नवरदेवाचे पाय धुतले, औक्षण केले आणि मंडपात आणले. नवरदेवाकडची मंडळी आत आली.

"मुलीला आणा, मुलीच्या मामाला बोलवा." उपाध्यायाची हाक ऐकू आली. कुसुमला घेऊन बाबासाहेब मंडपात आले. "शुभमंगल सावधान" होऊन लग्न समारंभ पार पडला. आठ वर्षाची कुसुम सौभाग्यवती झाली. आतापर्यंत परकर पोलक्यात वावरणा-या कुसुमला तो नऊ वारी साडीचा बोंगा आवरत नव्हता. त्यातच पाटल्या, बिलवर, बाजूबंद, हिरवा चुडा आणि पायात वजनदार तोडे हा भार पेलवत नव्हता. तिचा जीव घाबराघुबरा झाला होता.

लग्न समरंभ पार पडल्यावर कुसुम वरातीबरोबर सासरी गेली. सासर जवळच्याच आठ-दहा मैलावरच्या उंबरगावी होते. जाताना रडूनरडून कुसुमने खूप गोंधळ घातला. पाठराखण म्हणून तिची मोठी बहीण, उमा गेली होती. तिकडचे देवदेवक झाल्यावर मामांनी तिला आणवून घतले. सासरी तिचा जीव गुदमरुन गेला होता. नवी सूनबाई पाहायला म्हणून बायका येत होत्या. कुसुमला वर मान करुन पाहण्याच्चेही धाडस नव्हते. सर्वजण तिचे कौतुक करीत होते.

"किती देखणी आहे हो मधूची बायको ! पोरकी पोर, पण मामाने आंदण चांगले दिले हो." असे कौतुकाचे उद्‌गार ऐकू येत होते. कुसुम उमाचा हात घट्ट धरुन बसली होती. उमाला इकडे तिकडे भटकू देत नव्हती.

मामाकडे आल्यावर तिचा आनंद गगनात मावेना. अगोदर तिने परकर पोलका घातला. नऊवारी साडीचा बोळा बाजूला भिरकावला. दागिने काढून मामीजवळ दिले, आणि ती मैत्रिणीबरोबर खेळायला पळाली. मामी कौतुकाने पहात होत्या. लहानशी पोर दडपणाने आणि ओझ्याने कोमेजून गेली. खेळू देत हिला आहे तंवर. संसाराचे ओझे अंगावर पडले की कोठला खेळ आणि कोठल्या मैत्रिणि. कुसुमचे पूर्वीचे आनंदी जीवन सुरु झाले. हातातील हिरवा चुडा आणि गळ्यातील काळी पोत हाच काय तो बदल तिच्यात झाला होता. तिला खेळायला अंगण पुरत नव्हते. मामाचा मोठा चौसोपी वाडा होता. मधोमध मोठे अंगण आणि त्याच्या तिन्ही बाजूला पडाव्या आणि खोल्या होत्या. खोल्यातून आश्रित वर्ग आपल्या कुटुंबासह राहात असत. एका पडवीत गाई-म्हशी बांधलेल्या असत. त्यांच्या देखरेखीसाठी उत्तरप्रदेशचा बलभद्र नावाचा एक भैय्या होता. त्यामुळे घरी दूधदूभते भरपूर होते. लोणी काढ़ले की सर्व गावाला ताक  फुकट वाटले जाई. दहा-बारा गडी माणसे, पै-पाहुणे रोज जेवायला आसत.पाच-सहा बायका स्वयंपाक घरात राबत असत. मुलांच्या पंक्ती, माणसांच्या पंक्ती, गडी माणसांच्या पंक्ती आणि शेवटी बायकांच्या पंक्ती होत. त्यांना जेवायला दोन अडीच होत.घराच्या एका कोप-यात सुंदर चैन्यालय बांधलेले

होते. बाबासाहेब फार श्रद्धाळू होते. सकाळी आंघोळ झाली की सोवळे नेसून ते देवळात जात. एक पुजारी नेमला होता. पण बाबासाहेब गावात असले की स्वत: पार्श्वनाथ भगवंताची पंचामृताने अभिशेक करीत. अभिस्केकाला लहानमोठ्या सर्वांनी हजर राहीले पाहीजे असा दंडक होता. त्यानंतर सर्वजण एखादे तरी अष्टक देऊन, णमोकार मंत्राचे जाप्य देऊन आपापल्या कामाला लागत. बाबासाहेब मात्र स्वाध्याय करीत, ध्यान करित आणि मग सर्वांची न्याहारी होई. लोणी, भाकरी, चटणी हा नाष्टा असे. दुधाचा ग्लास प्यायल्यावर मुले खेळायला पळत. संध्याकाळी पुन्हा आरतीला सर्वांना हजर रहावे लागे. चार-पाच आरत्या म्हटल्या जात. बाबासाहेबांचे कुलदैवत पद्मावती होते. तिची पूजा अर्चा रोजच साग्र संगीत होत असे. नवरात्रात बाबासाहेब नऊ दिवस उपास करीत. त्या दिवसात दाढी, कटिंग करीत नसत. देवळात अखंड दिप जळत असे. पर्यूषण पर्वही असेच उत्साहाने साजरे होई. गावातील सर्व जैन लोक दर्शनासाठी बाबासाहेबांच्या घरीच येत. जाताना ताकाचा लोटा भरू न नेत.

बाबासाहेबांची शेती भरपूत होती. न्याहारी केल्यावर ते घोड्यावर बसून सर्व शेतीचा फेरफटका मारू न येत आणि नंतर पेंढीवर बसत. दोन-तीन मुनीमही असत . बाबासाहेबांना राजकारणाचीही आवड होती. कलेक्टरपासून सर्वांची त्यांचा संबंध येई. इंग्रज कलेक्टर पत्नीसहित बाबासाहेबांच्या शेतीवर हुरडा खाण्यासाठी येत. त्यामुळे घरात सर्वांना वर्दळीची सवय होती. बरीच वर्षे बाबासाहेब लोकल डिस्ट्रीक्ट बोर्डचे अध्यक्षही होते. त्यांच्या जिल्ह्यात ते अतिशय लोकप्रिय होते आणि अशा खेळीमेळीच्या वातावरणात, एकत्र कुटुंबात कुसुमचे बालपण गेले. आपण अनाथ आहोत, आपल्याला आईबाबा नाहीत, यांची त्या भावंडांना कधीच जाणीव झाली नाही. मामा आपल्या मुलांना जसे कपडे आणत तसेच सर्वांना-आश्रितांच्या मुलांना सुद्धा आणत. त्यामुळे कुसुमला आपण उपरे आहोत असे कधी वाटलेच नाही.

आणि कुसुमवर आकाशाची कु-हाड कोसळली. एकेदिवशी कुसुमच्या सासारहून बातमी आली की कुसुमचा नवरा सर्पदंशाने मेला. घरात रडारड झाली. शोकाकूल अवस्थेतच मामा-मामी कुसुमला घेऊन तिच्या सासरी गेले. बैलगाडीच्या प्रवासाच्या, दगदगीने ती झोपून गेली. परिस्थितीचे गांभीर्य समजण्याचे तिचे वयही नव्हते. सासरी जाताच कुसुमच्या बांगड्या फोडण्यात आल्या, तिचे कुंकू पुसण्यात आले. सर्व घर शोकाकूल झाले, पण कुसुमच्या डोळ्यात पाण्याचा थेंबही नव्हता. नवरा म्हणजे काय ? तो मेला म्हणजे काय ? तिला काहीच कळत नव्हते. आपल्या

एवढ्या सुंदर हिरव्या बांगडया फोडून टाकल्या म्हणून ती हुंदकेदेऊन रडू लागली. तेरवी झाल्यावर कुसुमला घेऊन मामा-मामी परत आले. कुसुम आता विधवा झाली होती. लग्न म्हणजे काय, सौभाग्य म्हणजे काय, यांचा अर्थ समजण्यापूर्वीच ती विधवा झाली होती.

"मला बांगड्या हव्यात. मी नाही नेसणार पांढरे पातळ." कुसुमचा थयथयाट चाले. मामी पदराने डोळे पुशीत तिची समजूत घाली.

"कुसुम, अगं तुझा नवरा मेला. तुला आता रंगीत बांगड्या नाही घालता येणार. पांढरीच पातळे नेसावी लागणार. "

"पण मीच का असं रहायचं ! उमा माझ्यापेक्षा मोठी आहे. ती , कुमुद कसे रंगीत कपडे घालतात, मग मीच का नाही ?" ती सर्वांची भांडायची पण या तिच्या कां चे उत्तर कोणाजवळ नव्हते. हळुहळू ती मूक झाली. तिने भांडायचे सोडून दिले. मामीला कामात मदत करू लागली. मामांच्या पूजेची तयारी करु लागली. त्यावेळी गावात शाळा होती चौथीपर्यंत. पण मुलांनी शाळेत जाण्याची पद्धत नव्हती. त्यामुळे तिला अक्षर आळखही नव्हती.दिवसभर ती इकडे तिकडे करी. एवढ्या लहान मुलीला काम तरी काय सांगणार ? मामामामी पुढे मोठाच प्रश्न होता. तसा वेळ जाण्याचा फारसा प्रश्न नव्हता. घरात नोकर चाकरांचा राबता, पाहुण्या रावळ्यांची वर्दळ, यामूळे दिवस निघून जाई.

बाबासाहेब त्याकाळी देखील पुरोगामी विचारांचे होते. कुसुमने आपले उभे आयुष्य असेच घालवावे हे त्यांना पसंत नव्हते. तिची बुद्धी चांगली होती. स्मरणशक्ती चांगली होती. टिवल्या बावल्या करण्यात वेळ घालवावा हे त्यांना आवडत नव्हते. त्यांनी स्वत: तिला लिहायला, वाचायला शिकवले होते. स्तोत्रे, आरत्या, भक्तमर, पूजा-अष्टकंवगैरे बाबासाहेबांबरोबर म्हणून म्हणून सर्वांबरोबर तिलाही पाठ होते. तिच्या पुढील शिक्षणाची काही सोय होऊ शकते का याचा ते शोध घेत होते.

या वर्षीच्या चातुर्मासासाठी त्यांनी कारंजाचे भट्टारक वीरसेन महाराज यांना आमंत्रण दिले होते. भट्टारंकांचे आगमन झाले. गावातील वातावरण मंगलमय झाले. त्यांचे प्रवचन ऐकण्यासाठी गावातील सर्व धर्मीय लोकांची गर्दी जमू लागली. आसपासच्या खेडोपाडीची जैन मंडळी भट्टारकांच्या दर्शनाला येऊ लागली. त्यांच्या प्रवचनाने मन, कान तृप्त करू न परत जाऊ लागले. बाबासाहेबांच्या घराला जत्रेचे स्वरुप आले. एकेदिवशी बाबासाहेबांनी भट्टारकांना विचारले-

"महाराज, आपण अनेक ठिकाणी फिरता, आपल्या दर्शनासाठी कारंजाला अनेक लोक येत असतात. मुलींच्या शिक्षणाची अशी कोठे सोय आहे का ? आमची कुसुम एवढ्या लहान वयात विधवा झाली आहे. तिला पुढे शिकवायची माझी फार इच्छा आहे. पण जवळपास नागपूर, अमरावतीला अशी काही सोय नाही."

"बाबासाहेब, मुंबईला तशी सोय आहे. मगनबाई नावाच्या बाईच्या शिक्षणासाठी त्यांच्या वडिलांनी एक आश्रम काढला आहे. तेथे दोन तीन विधवा स्त्रिया शिक्षण घेत आहेत. आपण कुसुमला तेथे पाठवायला तयार आहात का ?" भट्टारंकांनी विचारले.

"एवढ्या लांब ठेवायचे म्हणजे अवघड वाटते. पण तिच्या हितासाठी हा निर्णय घ्यावाच लागेल," बाबासाहेब म्हणाले.

"बाबासाहेब, अकोल्याची एक मुलगी सुमती तेथे आहे. आपण तिच्याशी पत्र व्यवहार करू न माहीती मागवू," भट्टारक म्हणाले.

"महाराज, मला आपणास आणखीन एक प्रश्न विचारावयाचा आहे. कुसुमचा नवरा मेला, त्यात तिचा काय दोष ? तीही एक स्वतंत्र आत्मा आहे. तिला संसार सुखाची चव कळण्यअधीच वैधव्य आले. उभा जन्म तिने तसाच घालवावा का ? एखादा चांगला मुलगा मिळाला तर तिचा पुनर्विवाह करुन घ्यावा का ? आपले या संबंधी काय विचार आहेत ?"

" मला तर त्यात काही वाईट दिसत नाही. पण आपला जैन समाज अजून जगाच्या फार मागे आहे. त्या समाजाला हे कितपत रुचेल हा प्रश्न आहे. कुसुमची आध्यात्माकडे ओढ असती तर तिच्या बहिणीप्रमाणे तिला दिक्षा देण्यास हरकत नाही. पण तिला जर संसाराची आवड असली तर मोहाने तिचा पाय घसरू न तिला आत्महत्या करण्याची वेळ येण्यापेक्षा तिचा पुनर्विवाह करणेच श्रेयस्कर असे मला वाटते. माझे भरपूर फिरणे असते. मोहापायी जीव देण्याची पाळी आलेल्या कितीतरी मुलींची मला माहीती आहे," भट्टाकरांनी उत्तर दिले. त्यानंतर तो विषय तेथेच राहीला.

भट्टारकांनी सुमतीच्या घरी पत्र पाठवून तिचा मुंबईचा पत्ता घेतला व आश्रमासंबंधीची सर्व माहिती विचारू न घेतली. ती सर्व माहिती वाचल्यावर, या सुट्टीत सुमती आली की तिच्या बरोबर कुसुमला मुंबईला पाठवायचे ठरले. घरच्या बायकामंडळींचा या गोष्टीला विरोध होता. पण बाबासाहेबांचा निर्धार पक्का होता. त्यांना कुसुमचे जीवन सत्कारणी लावायचे होते. मे च्या सुट्टीत सुमती अकोल्याला आली, तेव्हा बाबासाहेबांनी तिची भेट घेऊन आश्रमातील शिक्षक, तेथील

वातावरण, राहणा-या मुली या सर्वांची बारकाईने चौकशी केली आणि जून मध्ये सुमती बरोबर कुसुमचीही रवानगी झाली. बाबासाहेब स्वत: तिला पोचवून जातीने सर्व व्यवस्था पाहून आले. त्यांना समाधान वाटाले. मुलीला चांगले वळण लागेल आणि शिकली तर आपल्या पायावरही उभी राहू शकेल याचा त्यांना विश्वास वाटला.

थोड्याच दिवसात बाबासाहेब कालवश झाले. त्यांचा मोठा मुलगा उमेश तसा लहानच होता. पण बाबासाहेबांच्या तालमीत तयार झाल्यामुळे त्याने तो डोलार सांभाळला. आपले कॉलेजचे शिक्षण अर्धवट सोडून तो वडगावला राहायला आला. सर्व कारभार स्वत: सांभाळु लागला. हळूहळू आश्रितांची गर्दी कमी होऊ लागली. काळ बदलू लागला. बाबासाहेबांच्या मृत्यूनंतर मामीही एकदम अलिप्त झाल्या. संसारात त्या पुर्वीसारखे लक्ष घालीत नव्हत्या. कुसुमच्या शिक्षणात मात्र उमेशने खंड पडू दिला नाही. तिचे सुट्टीत येणे नियमीत सुरु झाले. ती सातवी पर्यंत शिकली. पुढे दोन वर्षाचा ट्रेनिंग कोर्सही तिने पूर्ण केला. आता ती स्वत:च्या पायावर उभी राहू शकत होती. ती वडगावला परत आली. नोकरीसाठी तिने नागपूरला अर्ज केला आणि तिला प्राथमिक शिक्षिकेची नोकरीही मिळाली. बाबासाहेबांच्या नागपूरला शिकणा-या शरद आणि सुधा बरोबर तीही  राहू लागली.

परंतु तिच्या जीवनात एक वादळ आले होते. मुंबईला शिकत असताना त्यांना धार्मीक शिक्षणासाठी जीवंधर पंडीतंची नेमणुक केली गेली होती. जीवंधर पंडीत अतिशय सुंदर होते. बुद्धीमानही होते. त्यंचे व्यक्तीमत्व आणि वक्तृत्व प्रभावी होते. ते बोलत राहिले की ऐकतच राहावेसे वाटे. शिकवताना, एखादा विषय मग तो धार्मिक असो की सामाजिक त्या विषयाची समरस होऊन ते समजावून देत. त्यामूळे आश्रमातील विद्यार्थिनी त्यांच्यावर खूष होत्या. कुसुमवर त्यांची खूप मर्जी होती. तिची बुद्धिमत्ता, चौकस वृत्ती त्यांच्या केव्हाच ध्यानात्र आली होती. ती वेगवेगळ्या विषयावर प्रश्न विचारू न त्यांना भंडावून सोडी. तिचे समाधान करण्यात त्यांनाही समाधान वाटे. बुद्धिमान शिक्षक आणि तशीच बुद्धीमान शिष्या हा दुग्ध शर्करा योगच होता. त्यातून ते एकमेकांकडे कधी आकर्षित झाले त्यांनाही कळले नाही. त्यातच अनेक वर्षापासून त्यांची पत्नी क्षयाने आजारी होती. त्यामूळे तिच्या सेवेला दिवसभराची एक बाई नेमून जीवंधर जास्तीत जास्त वेळ आश्रमात घालवी. त्यांचा आणि कुसुमचा जास्त संबंध आला. देखण्या चुणचुणीत कुसुमने त्यांच्या ह्रदयात घर केले. कुसुमलाही जीवंधर आवडला होता. पण जीवंधराची पत्नी जीवंत असे

पर्यंत त्यांच्या मनात विवाहाचा विचार नव्हता. कुसुम नागपूरला आल्यावर थोड्याच दिवसात जीवंधराची पत्नी कालवश झाली. जीवंधरांची कुसुमला पत्रे येऊ लागली. कुसुमचे अंतःकरण द्विधा झाले.

मी एवढ्या मोठया, धार्मिक कुळातील मुलगी. मी पुनर्विवाह केला तर लोक काय म्हणतील ? मामा पुरोगामी होते म्हणून मला शिकण्याची संधी तरी मिळाली. माझ्या विवाहाने माझ्या भावाचे जगणे मुष्कील होऊन जाईल. माझी मोठी बहीण रत्नावती ही ही बालविधवाच होती. तिने आर्यिका दीक्षा घेऊन समाजाच्या कल्याणात आयुष्य घालवले. मी तसे करावे का ? नाही. मला ते झेपणार नाही. लग्न म्हणजे काय ते मला कळतही नव्हते, तेव्हाच मला वैधव्य आलं. माझा काय दोष ? मी तर वयात आल्यावर सासरचं तोंडही पाहिलं नाही. न पाहिलेल्या नव-याच्या नावानं मी उभं आयुष्य वाया का घालवायचं ? तिला निर्णय घेता येईना. तिने सुमतीला नागपूरला बोलवून घेतले.

"सुमती, मी काय करू गं ? मला काहीच समजत नाही. जीवंधराशी लग्न करु की नको. " कुसुम म्हणाली.

"तुला काय वाटातं ? लग्न करावसं वाटतं का ?" सुमतीने विचारले.

"एकदा वाटतं, पुनः विचार केलं तर करु नये असं वाटतं." कुसुमने आपली द्विधा मनस्थिती सांगितली.

"तुझ्या मनाला प्रामाणिकपणे जे वाटते ते कर. लोक काय म्हणतील याचा विचार करु नकोस. लोक दोन्हीकडून बोलतात," सुमती म्हणाली.

"मला तर लग्न करावसं वाटतं . मी जर नकार दिला तर जीवंधरही दुस-या कोणाशी लग्न करणार नाही. त्यांचही आयुष्य वाया जाईल. पण आपला जैन समाज किती जुनाट विचारांचा आहे, तुला माहीतच आहे. त्या समाजाला मान्य होईल का हे ?" कुसुम म्हणाली.

"तू तुझ्या भावाचा, मेव्हण्यांचा सल्ला घे. तुझे मामा आज असते तर त्यांनी स्वतःच पुढाकार घेऊन तुझं लग्न लावून दिलं असतं असं मला वाटतं," सुमतीने सल्ला दिला. दोन दिवसांनी सुमती अकोल्याला निघून गेली.

कुसुमने आपले प्रेमप्रकरण अजून घरात कोणालाच सांगितले नव्हते. एकेदिवशी तिने आपला धाकटा मामेभाऊ शरद आणि सुधाचे पती मदन यांना जेवण झाल्यावर दिवाणखान्यात बोलावले. तिचा गंभीर चेहरा पाहून काहीतरी गंभीर बाब आहे, हे तिघांच्याही लक्षात आले.

"मला तुम्हाला काही सांगायचे आहे. मी मुंबईला आश्रमात शिकत असताना, जीवंधर नावाचे एक पंडीत आम्हाला धार्मिक शिक्षण देण्यासाठी येत होते. आम्ही एकमेकांकडे आकर्षित झालो. माझे, जीवंधरावर प्रेम आहे. तो माझ्याशी लग्न करायचे म्हणतो. काय निर्णय घ्यावा हे मला कळत नाही. तुमचा सल्ला मला हवा आहे," कुसुम म्हणाली.

"अगं कुसुम, त्यावर विचार करायला हवा, तुझ्या अमृत दादाचा, उमेश दादाचाही विचार घ्यायला हवा. आपण सर्व मिळून विचार करुन ठरवू या. तुझी इच्छा आहे का लग्न करण्याची ? " मदनने विचारले आहे. "हो आहे. पण मला भिती वाटते. मामाचे नाव सा-या विदर्भात, मध्य प्रदेशात सर्वांना माहीत आहे. त्यांच्या भाचीने असे काही केले तर मामांची बदनामी नाही का होणार ? आणि लग्न नाही केले तर जीवंधराचे काय ? तोही जन्मभर एकटाच राहील ." कुसुम म्हणाली.

"तू काळजी करू नकोस. आम्ही पाहतो काय करायचे ते," मदन म्हणाला. त्याच दिवशी मदन वडगावला गेला. त्याने अमृत आणि उमेशला सर्व गोष्टी सांगितल्या. आणि विवाहाला संमती देण्याची विनंती केली. प्रथम अमृत तयार नव्हता. तो चिडून म्हणाला-

"कारटीनं कुळाला बट्टा लावला. मामांनी उगीच तिला मुंबईला ठेवलं . चांगलेच दिवे लावले तिने."

"अमृत दादा चिडू नका. शांतपणे विचार करा. तरू ण वय आहे. नोकरी करते आहे. दिसायलाही सुंदर आहे. उद्या दुस-याच कोणाच्या मोहात सापडून तिचा पाय घसरला तर ! ती बदनामी आपल्याला केवढी महागात पडेल. तीनं पळून जाऊन लग्न केलं तर आपण काय करणार आहोत ? त्यापेक्षा ती मानाने विचारते आहे, तर मोठ्या मनाने तिचे लग्न लावून द्यावे, असं मला वाटतं," मदन म्हणाला.

घरात वडीलधारी मामीच होती. तिचाही तोच विचार पडला. कुमुदनेही होकार दिला. तेव्हा समाधानाने मदन नागपूरला परत आला. नागपूरला जैन समाजात त्यावेळी पुनमचंद राका, पन्नालाल देवडीया, त्यांची पत्नी विद्यावती इ. पुरोगामी मंडळी होती. मदन आणि शरद त्यांनाही भेटले. त्यांनीही या विवाहाला संमती दिली.

सगळे ठरल्यावर नागपूरला चिटणीस पार्कमध्ये जैन समाजाच्या उपस्थितीत विवाह साधेपणाने पार पडाला. त्याच वेळी सनातनी लोक निषेधाच्या घोषणा देत काळे झेंडे घेऊन उभे होते. तर काही लोक या नवीन उपक्रमाचे स्वागत करीत होते. पण खरा प्रश्न वडगावला येणार

होता. कारण, वडगाव हे नागपूर आणि मध्यप्रदेशच्या बॉर्डरवरचे एक लहानशे खेडे होते. अमृत-कुमुद आणि उमेश गावी परत आले. त्यांना ख-या संकटाला सामोरे जावे लागले. पण जैन लोकांनी त्यांच्या वर बहिष्कार घालायचे ठरविले. पण उमेश बाबासाहेबा नंतर गावचा पाटील झाला होता. पाटलाकडे सर्वांचे पदोपदी काम पडे. त्यामूळे ८-१० दिवसानंतर हा बहिष्कार माग घेण्यात आला.

कुसुम आणि जीवंधर दुस-या गावाला गेले. तेथे त्यांनी प्रेस टाकला. मासिक काढले. कुसुमची नोकरीही सुरु झाली. काही दिवसांनी  सर्व लोक हा पुनर्विवाह होता ही गोष्ट विसरुनही गेले.

. . . . . . . . . . . . . . . .

१९३२-३३ सालची ही सत्य घटना आहे. पुनर्विवाहाची गोष्ट काढणे देखील ज्या वेळी शक्य नव्हते. त्या काळी हा पुनर्विवाह घडून आला होता.